"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 06, Issue: 05, Sept. – Oct. 2019 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) – 5.266

# अर्वाचीन मराठी वाङ्मयातील टीका लेखनाचे विवेचन

**प्रा. डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील**
सहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग
विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत

**प्रस्तावना :**

वस्तुत: मराठी टीकेची परंपरा उज्ज्वलच आहे. भरतमुनी, अभिनवगुप्त, मम्मट, विश्वनाथ इत्यादी हे तिचे दूरचे आप्त दृष्टीआड झाले तरी, गो. ग. आगरकर, वि. कृ. चिपळूणकर, श्री. कृ. कोल्हाटकर, न. चिं. केळकर, बा. अ. भिडे, मा. व्यं. पटवर्धन इत्यादी रसिकांनी तिला लहानची मोठी केली. आता ती प्रौढा स्वत:चेच समंजसपणाने निरीक्षण करीत आहे. या कामी तिला डॉ. रा. शं. वाळिंबे, प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. दि. के. बेडेकर, डॉ. व. दि. कुलकर्णी, प्रा. स. शि. भावे इत्यादिकांची मोठीच मदत मिळत आहे. ती इथली (लौकिक) की दुसरी कुठली? (अलौकिक) असा इहवादाचा आणि गूढवादाचा पेचप्रसंग तिने रसिकांपुढे टाकला आहे. अनेक रसिक तिच्या ज्ञात व अज्ञात, वस्तुगत वा मनोगत, प्रकट वा अप्रकट इ. छंदांचा (सौंदर्याचा) शोध घेण्यात मग्न झाले आहेत. तिला आपल्या इतर भाषा भगिनींचीच ओढ लागून राहिली आहे असेच नाही, तर परदेशातील भाषाभगिनींच्या परिचयाची तिला उत्सुकता आहे. आजच्या विज्ञानयुगात तिने स्थलकालाचे अंतर ओलांडले

आहे, आणि परस्परविरोधी विचारविनिमयांच्या क्षेत्रात तिचे पाऊल पुढेच पडत आहे. अशा या तिच्या व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ स्वरूपांशी एकरूप होण्यात वाचकांनाही आनंद होत आहे.)

**अर्वाचीन मराठी वाङ्मयातील टीका लेखनाचे विवेचन :**

टीकाकार हा एक स्वतंत्र प्रज्ञेचा लेखक असून कवी, नाटककार किंवा कादंबरीकार यांच्या योग्यतेप्रमाणेच त्याची कृती स्वतंत्र प्रतीची असते ही कल्पना मराठी वाङ्मयात हळूहळू दृढमूल होत आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हाटकरांच्या लेखसंग्रहाला प्रस्तावना लिहितांना न. चिं. केळकर यांनी त्यांचे काही वर्ग पाडले. त्यात पोलीस, न्यायाधीश व कायदे निर्माण करणारा यांचा त्यांनी समावेश केला. त्यापैकी "मल्ल हा पोलीसात अंतर्भूत होतो. शिक्षक व कायदे करणारा हे जवळजवळ एकच, आणि मित्राचा समावेश न्यायाधीशात होऊ शकेल," असे ते म्हणतात. न्यायाधीशाची समतोल बुद्धी व मित्राची सहानुभूती, ही ज्या टिकेत दिसून येते ती टीका उच्च दर्जाची होय. ही त्यांची विचारसरणी आजच्या टीकेचे महत्त्व प्रतिपादन करणारीच आहे. ग्रंथ व ग्रंथकार हे ही इतर सृष्ट वस्तूंइतकेच वाङ्मयविषय होऊ शकतात असेही त्यांचे मत आहे.

टीका लेखन ही एक प्रकारची स्वतंत्र वाङ्मयकृती आहे, आणि वाङ्मय विकासाचे ते एक महत्त्वाचे अंग आहे. कोणत्याही वाङ्मय प्रकारात ज्याला स्वत:चे वैशिष्ट्ये दाखविता येत नाही, तोच टीकालेखनाकडे वळतो. टीका ही वाङ्मयवृक्षावरील विघातक, बल्ली आहे, सृजनशील कलेचा दर्जा खालावला म्हणजेच टीकाकारांचा सुकाळ होतो, अशा प्रकारच्या समजुती वाङ्मयक्षेत्रात पूर्वापार चालत आल्या आहेत.

कलेच्या प्रांतात धंद्याच्या दृष्टीचा शिरकाव झाला म्हणजे वरील गोष्टी होतात हे खरे, पण टीकाकार म्हणजे वाङ्मय वृक्षावरील एक बांडगुळ असे मानणे म्हणजे टीकेच्या खऱ्या

अर्थाचा विपर्यास करण्याजोगे आहे. टीकाकार हा क्वचित प्रसंगी विध्वंसक असतो, पण तो तेवढाच काही त्याचा स्वभावधर्म होत नाही. कातर स्वभावाच्या कवीला कधीकधी त्याची भिती वाटली तरी त्याच्याकडून होणाऱ्या रसग्रहणाच्या अभावी त्याची कला अपूर्ण राहणार हेही खरेच. ''पहा उघडिले हृदयाला । यात सुखे घाला भाला ।। कोमल कौशल्ये नटला । कर तुमचा जरी किती असला ।। तरी तयाने माझी कवने – जरा स्पर्शणे ।। सहन न होणे मुळी मला '' असे रे. टिळक यांनी उदगार काढले असले तरी ते रसिकांची मनधरणी करण्यास व दृष्टीविना दृश्य करील काय' म्हणून कलेचे सार्थक रसिकच करतो, असा विश्वास प्रकट करण्यास चुकले नाहीत. मागील प्रकरणात प्राचीन मराठी कवींचा रसिकांकडे पाहण्याचा दृष्टीकोण कसा असे याचे विवेचन केले आहे. त्यावरूनही प्राचीन मराठी वाङ्मयातील रसिकांचे स्थान हे स्वतंत्र होते, असे दिसून येईल. कवीप्रमाणे टीकाकार दुर्मिळ असतो, आणि कविता जशी गवतासारखी उदंड माजते तसाच टीकेचाही पैâलाव होतो हे खरे; पण त्यावरून टीकाकारांचा सुकाळ म्हणजे स्वतंत्र लेखकांचा दुष्काळ ठरत नाही.

टीकाकाराला स्वतंत्र लेखकाप्रमाणेच मान देण्याची प्रवृत्ती मराठी वाङ्मयात आरंभी म्हटल्याप्रमाणे अधिकाधिक बळावत आहे. 'सुधारक' या काव्याच्या आरंभी डॉ. मा. त्रिं. पटवर्धन यांनी आजच्या काळातील टीकाकारांचे कार्य हे एक प्रकारे कसे कठीण होऊन बसले आहे, याचे मार्मिक विवेचन केले आहे. 'सुक्या' बरोबर 'ओले' ही जळते आणि 'छुपी आवड' व 'दिखाऊ तिटकारा' असणाऱ्या ढोंगी रसिकांस डोक्यावर घेऊन नाचणारे वाचक आढळतात. डॉ. पटवर्धन यांचा सात्विक संताप वरील लेखात व्यक्त झाला आहे. वास्तविक पाहता ज्या वाङ्मयात नवी सृष्टी, नवी दृष्टी व नवी तुष्टी या तीन गोष्टी उदयास येत आहेत त्या वाङ्मयात वरील दृष्टीकोनांचे नवे नवे टीकाकार निर्माण होणे हे अपरिहार्यच नाही काय?

स्वतंत्र प्रतिभेच्या टीकाकारांचा गौरव करतांना ग. त्र्यं. माडखोलकर यांनी नभोवणीवरून केलेल्या आपल्या एका भाषणात खालील उदगार काढले की, ''सृजनशील टीकाकार हा कवी आणि कादंबरीकार यांच्यापेक्षाही एका परीने श्रेष्ठ म्हणावा लागेल.''

वाङ्मयनिर्मितीस कारणीभूत होणाऱ्या आद्यप्रवृत्तीच टीकात्मक प्रवृत्ती संभवते, याचे विवेचन मानसशास्त्रीय प्रकरणात केले आहे. त्यावरूनही टीकाकाराला स्वतंत्र लेखक मानणे हे इष्ठ ठरेल. चालू प्रकरणात इंग्रजी अंमलात मराठी उदयास आलेल्या टीकाकारांच्या कार्याचे कालानुक्रमाने टीकात्मक विवेचन करावयाचे ठरविले आहे.

मराठी वाङ्मयातील गेल्या सव्वाशे वर्षातील उत्तोमत्तम लेखकांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, त्यात बहुतेक पहिल्या प्रतीचे लेखक हे पहिल्या प्रतीचे टीकाकार म्हणून प्रसिद्धीस आले. उंबराचे फळ तेवढे दिसावे पण त्याचे फूल मात्र त्याच्या पोटात गुप्त रीतीने राहावे, त्याप्रमाणे वरील लेखकांचे टीकाकर्तत्व त्यांच्या इतर प्रकारांच्या वाङ्मयकृतीत सकृद्दर्शनी लुप्त  झाल्यासारखं दिसते. कस्तुरीमृगाप्रमाणे वरील लेखकांना आपल्या ठिकाणी न जाणवलेला हा टीकात्मक सुगंध वाङ्मयात दरवळल्याशिवाय कसा राहील?

संशोधन, संकलन व दर्शन हे जे टीकेचे तीन प्रकार राजवाडे यांनी इतिहासकारांच्या कार्यास लावले आहेत, तेच टीकाकाराच्या कार्यासही लागू पडणारे आहेत. चिपळूणकरांच्या अगोदरचे आणि त्यांचे समकालीन टीकाकार हे पहिल्या दोन वर्गात येतात. त्यांचे कार्य केवळ संशोधनात्मक व संकलनात्मक स्वरूपाचेच झाले.

संपादन-कौशल्य हे एक टीकेचे प्रमुख अंग होय, आणि ते प्रकट करणाऱ्या टीकारांतही काही मुलभूत गुण असतात याची जाणीव ठेवली पाहिजे. संपादन कौशल्य ही एक प्रकारची स्वतंत्र अशी टीकेची शाखाच होय. मात्र या टिकेला शास्त्रशुद्ध वळण मिळणे आवश्यक असते.

प्राचीन मराठी कवी हा तत्कालीन टीकाकारांच्या चर्चेचा आवडता विषय झाला होता. संस्कृत ग्रंथापासून विषयांची, विचारांची आणि अलंकारांची उसनवारी मोरोपंत, वामन पंडित, मुक्तेश्वर इत्यादिकांनी केली. त्यांनी आपल्या काव्यविषयांकरिता रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथातील आख्याने निवडली. यावरून वरील कवी हे परपुष्ट आहेत असा एक पुर्वपक्ष आहे. त्यांच्या या मताचे निराकरण ज्यांनी केले त्या टीकाकारांची चर्चा प्रामुख्याने नजरेसमोर येते. मुळ संस्कृतीतील वाङ्मयीन कृती व तिच्या आधारे वरील कवींनी लिहिलेल्या आर्या, ओव्या व श्लोक यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास कथानकातील संक्षेपविस्तार अलंकारांतील नावीन्य, विचारांतील मौलिकता या बाबतींत त्यांनी दाशखविलेली स्वतंत्रता लक्षात घेऊन त्यांचे यर्थार्थ मुल्यमापन करण्याची टीकापद्धती तत्कालीन रसिक वर्गात दिसून येते.

उदाहरणार्थ, रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनी ‘‘मोरोपंतांचा शब्द म्हणजे केवळ ब्रह्मवाक्य ही कल्पना सोडून त्यांच्या प्रीतीच्या एकशे एकवीस श्लोकांमध्येच जो पुर्वापार असंगतपणा किंवा इतर दोष असतील तेही दाखविणे हा टीकाकारांचा धर्म आहे.’’ असे म्हटले. (वि. विस्तार पु. १ अं. ४) आणि तदनुसार ‘केकादर्शा’ चे गुणदोष विवेचन केले. तथापि जुन्या मराठी कवींनी संस्कृत ग्रंथातून विषय व कथाभाग तोच असला तरी त्याच्या वर्णनात कमी अधिक भर टाकण्याची त्यांची स्वतंत्र बुद्धी व कल्पनाशक्ती दिसून आली. हा मुद्दाही गुंजीकरांनी लक्षात घेतला. अशाच प्रकारे वामन दाजी ओक यांनी ‘कृष्णविजया’ च्या आख्यानांचे, आणि नारायण चिं. केळकर यांनी ‘शल्यपर्वा’ चे त्या त्या मूळ कृतींच्या संदर्भात तौलनिक परीक्षण करून मोरोपंतांच्या स्वतंत्र कर्तृत्वाने निदान केले. सारांश, प्राचीन मराठी कवींनी रामायण महाभारतादी ग्रंथांतील कथानकाच्या बाबतीत संक्षेपविस्ताराचे धोरण ठेवले व मानवी जीवनातील खळबळ उडवून देणाऱ्या प्रसंगांचे, वा

व्यक्तींच्या मनातील संघर्षाचे चित्रण करताना आपल्या प्रतिभेचे स्वातंत्र्य अबाधितच ठेवले असा निष्कर्ष तत्कालीन काही टीकाकारांनी काढला.

"कथासुत्रास जेथे प्राधान्य असेल तेथे पाहिजे तितके घ्यावे, पण जेथे विचार सुत्रास प्राधान्य असेल तेथे विचारांचा अपकर्ष होऊ नये म्हणून आपण आपली यमकाभिरूची आडवी येऊ देऊ नये", असा भाषांतरकार कवींचा दृष्टीकोन होता. डॉ. केतकर यांचे यासंबंधीचे खालील उदगारही, मोरोपंतांना जे परोपजीवी कवी म्हणतात त्यांनी तर विशेषच लक्षात ठेवले पाहिजेत. "मोरोपंतांचे कार्य केवळ मुलकृतिपरीक्षण नसून नवकृतीकरण हे होते. काव्यपरीक्षणाच्या पुढची कृती त्यास करावयाची होती. कल्पना करा की, एका इमारतीप्रमाणे दुसरी एक इमारत बांधली आहे. दुसरा ी इमारत बांधताना स्थूलपणे जरी दोन्ही सारख्याच दिसल्या, तरी पहिली व नंतरची या दोन्हीही इमारतीत पुष्कळ फरक आहे. अशा वेळेस दुसरी इमारत बांधणाऱ्या मनुष्यास पहिल्या इमारतीवर केवळ टीकाच करावयाची नसते, तर त्याच्या दृष्टीने काही प्रत्यक्ष सौंदर्यविषयक सुधारणाच करावयाची असते." (महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण प्र.१३) याचा अर्थ प्राचीन कवींचे संस्कृत वाङ्मयातील ग्रंथांचे मराठी भाषेतील रसग्रहण म्हणजे स्वतंत्र कलाकृतीचे मंदिरच होय.

मोरोपंतांच्या कवितेसंबंधी आदरभाव दाखविणाऱ्या टीकालेखनाचा एक प्रातिनिधिक नमुना म्हणून वै. बाळकृष्ण मल्हार हंस यांनी इ. स. १८७९ मध्ये लिहिलेल्या मोरोपंतावरील निबं धातील पुढील उतारा उल्लेखनीय वाटतो. "मोरोपंतांची कित्येक पद्ये स्वतंत्रपणे आनंदजनक आहेत व किती एकंदर प्रबंधात संलग्न असताना आनंदाला प्रसवतात. तथापि भारतादी ग्रंथरचनेतील त्यांच्या स्वतंत्र कल्पना आणि स्वतंत्र रचलेल्या ग्रंथातील कल्पना ह्या सर्वांचे एकीकरण करून पाहिले असता मोरो पंतांसारखी कवितास्फूर्ती आजपर्यंत झालेल्या कोणत्याही महाराष्ट्र कवीस नव्हती, व पंताने रचलेला आहे इतका काव्यग्रंथही दुसऱ्या मराठी भाषाकवीने रचलेला नाही हे स्पष्ट दिसते, दुसरे कवितेचा

"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 06, Issue: 05, Sept. – Oct. 2019 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) – 5.266

आत्मा जो रस तो ज्या मायेच्या आश्रयाने राहतो, ती चमत्कारिक कल्पनाही मोरोपंतांच्या काव्यात सर्वत्र भरलेली आहे. कोणत्याही विषयाचे वर्णन करताना प्रत्येक गोष्टीचे स्वरूप दृष्टान्तादी अलंकारांनी उत्कर्षेकरून दाखविण्याचा यत्न मोरोपंतांनी पद्यात केलेला आढळतो. कितीएक ठिकाणी त्यांच्या कल्पना इतक्या उज्ज्वल व उदात्त आढळतात की, त्या कामात ते नामांकित संस्कृत कवींची स्पर्धा करीत आहेत की काय असा भास होतो." ("हंस' कृत मोरोपंत',आवृत्ती २ री, पृष्ठ ९८-९९) ही मोरोपंतावरील निव्याज प्रेमाचे एक टोक दाखविणारे टीका होय. न्या. रानडे यांनी केकावलीवरील घेतलेल्या आक्षेप आणि त्यांचे चिपळुणकरांनी केलेले खंडन, हा वादविवादात्मक मनोरंजनाचा भाग चिपळूणकरांवरील स्वतंत्र टीकेत पुढे चर्चिला आहे.

वै. न्या. मू. महादेव गोविंद रानडे यांनी आपल्या समालोचनत्माक दृष्टीने तत्कालीन लेखकांच्या विविध वाङ्मयप्रकारांतील लहानमोठ्या पुस्तकांचे समतोल बुद्धीने परिक्षण करून त्यांना उत्तेजन दिले. 'ओरिएंटल ट्रान्सलेटर' या अधिकार पदावरून त्यांनी मराठीतील पुस्तकांच्या परीक्षणाचे कार्य केले.

इ.स. १८६४ पर्यंतच्या मराठीत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा पहिला आढावा आणि त्याचप्रमाणे इ.स. १८९८ पर्यंतच्या प्रसिद्ध झालेल्या मराठीतील गद्यपद्य ग्रंथांचा दुसरा आढावा घेऊन त्यांनी साठ निवडक पुस्तकांची यांदी प्रसिद्ध केली. त्यात काव्यात्मक १७, चरित्रविषयक-१०, इतिहासात्मक-४, कल्पित कथात्मक १०, नाटकात्मक-१०, शास्त्रीयविषयक २, व निबंध व प्रवासात्मक ७ मिळून एकंदर साठ पुस्तके येतात.

टीकाकारांप्रमाणेच इतर आधुनिक टीकाकारांची व्यक्तीगत वैशिष्ट्ये त्यांच्या टिकालेखांतून प्रकट झाली आहेत. उदा. श्री. वा. ना. देशपांडे यांची सौंदर्यविषयक कल्पना व तीत त्यांचे गूढावर प्रेम करणारे व आत्मसाक्षात्कारावर भर देणारे मन, प्रा. भ. श्री.

पंडित यांची आधुनिक मराठी काव्याच्या रसग्रहणात दिसून येणारी कलादृष्टी आणि रसिकता, प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मयातील काहीशा दृष्टीआड झालेल्या वाङ्मयप्रवाहाच्या 'वाटा' ची व 'वळणां' ची मार्मिक पहाणी करण्याचा प्रा. गो. म. कुलकर्णी यांचा प्रागतिक दृष्टिकोन, प्रा. माधव मनोहर यांची जुन्या नव्या वाङ्मयाकडे पाहण्याची चिकित्सक व वास्तवावर भर देणारी प्रवृत्ती डॉ. ग्रामोपाध्ये यांची ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या निरीक्षणातून आढळणारी अनाग्रही तौलनिक दृष्टी, डॉ. पण्डित आवळीकर यांचे 'स्वामी', 'सुधारक' इत्यादी कलाकृतींवरील परीक्षणलेखांतून प्रकट झालेले सखोल 'वाङ्मयचिंतन', लघुकथांच्या विवेवचनात प्रा.म.ना. अदवंत यांची दिसून येणारी सौंदर्यपिपासु अभ्यासू वृत्ती, प्रा. भालचंद्र खांडेकर यांच्या नाट्यकलेवरील टीकेत दिसून टेणारा विश्लेषणात्मक मनोभाव, डॉ. सु. रा.चुनेकर यांनी माधवराव पटवर्धन यांच्या समग्र वाङ्मयीन कार्याचे केलेले चिकित्सक रसग्रहण, साहित्यातील प्रीतिभावनेच्या दिव्यत्वाचे- भक्तीचे – प्रा. मुरलीधर जावडेकर यांनी केलेले साधार संशोधन इत्यादी त्या त्या टीकाकारांची स्थूल वैशिष्ट्ये लक्षात घेतल्यास आधुनिक मराठी वाङ्मयात विविध वाङ्मय प्रकाराप्रमाणेच टीकावाङ्मय प्रकारांचे दालन अनेकांनी कसे गजबजून गेले आहे ते दिसून येईल. टीका हा एक ललित वाङ्मयाचा प्रकार होय, हे कोल्हाटकरांनी केलेले खालील निदान खरे झालेले पाहून कोणास आनंद वाटणार नाही !

"टीकात्मक वाङ्मय हेसुद्धा अशा विविध (बोधपर व मनोरंजक) प्रकारच्या वाङ्मयात येऊ शकते. कारण त्यावरून टीकाविषयीभूत कृतीचे स्वरूप जसे स्पष्ट होते, तसे टीकाकारांचे विविध मनोधर्मही व्यक्त होतात. या वाङमयाच्या मुळाशी असणारे सौंदर्यशास्त्र (), समाजशास्त्र,. नितीशास्त्र, तत्वज्ञान इत्यादिकात प्रतिपादिलेल्या विषयासंबंधाने इतका मतभेद आहे (व तो जगाच्या अंतापर्यंत तसाच रहावयाचा) की,

त्यावरील अनेक ग्रंथात विचारांच्या व भाषेच्या वैचित्र्यास बराच अवसर मिळून, त्यांचा समावेश मनोरंजक वाङमयात होऊ शकतो.'' (कोल्हाटकर लेखसंग्रह : पान ५३९)

## समारोप :

''कलात्मक रीतीने जीवन-दर्शन घडविणे हा कलेचा अंगभुत धर्म व कार्य आहे.'' (साहित्यविचार : पान ९०) या एका वाक्यात प्रा. दि. के. बेडेकर यांनी टीका क्षेत्रातील अनेक प्रश्नांना एकत्रित आणले आहे असे वाटते. कलेतील भावना शास्त्रदृष्ट्या लौकिक स्वरूपाची वाटली, तरी तिची प्रतीती विशिष्ट कलात्मक पातळीवरूनच रसिकांना घ्यावी लागते, कला निर्हेतुकपणे निर्माण झाली तरी कलावंताच्या व इतरांच्या जीवनविकसनाचा हेतू तिच्यात अप्रत्यक्षपणे ग्रथित झालेलाच असतो. सौंदर्यकृतीचा अनुभव हा कलावंतानेच निर्माण करून अनुभवलेला असतो. इत्यादी बेडेकरांची मते साहित्यविचारात प्रकट झाली आहेत. (साहित्यविचार : पृ. ९७,९९,१०७ पहा) व्यक्तिमानावर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे उमटलेल्या अनेक अवांतर संस्कारांचा परिणाम तिच्या कलाकृतींवर अपरिहार्यपणे होतोच. 'ज्ञान, नीती व कला यांची सांगड घातल्यामुळे कलेचे वैशिष्ट्ये नाहीसे होत नाही.' ('साहित्यविचार' : पान ५२ अशी त्यांची व्यापक दृष्टी आहे. मात्र कलात्मक पातळीवरूनच कलेचे जीवनदर्शन कार्य करावे, असा त्यांचा दृष्टिकोण त्यांच्या टीकाविषयक विचारसरणीमधून आढळतो.पौरस्त्य व पाश्चात्य टीकाग्रंथातील ग्राह्याग्राह्य विचारांचा कलादृष्ट्या समतोल विचार करणारी त्यांची वरील मनोवृत्ती अनाग्रही व सत्यसंशोधक रसिकांची आहे याचा प्रत्यय रसिकांस येतो.

संदर्भसूची :

१) मराठी साहित्य समालोचन, वि. सी. सरवटे

२) अर्वाचीन मराठी साहित्य - माने पाटील, जोशी, नेने

३) आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती – कृ. भि. कुलकर्णी

४) अर्वाचीन मराठी गद्याची पुर्वपिठिका, गं. बा. शरदार

५) मराठी गद्यांचा इंग्रजी अवतार, द. वा. पोतदार

६) मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड-४), रा. श्री. जोग

७) अर्वाचीन मराठी काव्य – रा. श्री. जोग

८) मराठी कविता १९४५-१९६५, रा. श्री. जोग

९) नवकवितेचे एक तप – रा. अ. काळेले

१०) मराठी निबंध – म. वि. फा